# Visual MELODY

THE RAVI PARANJAPE STUDIO

E-Magazine About Visual Arts In free india
By - The Ravi Paranjape Studio

Volume 18 - Quarterly Issue - 1st June 2024

5th Year of Visual Melody E-Magazine



## COVER STORY

Eminent Artist
Walter Langhammer

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.

***“Absorb the beauty and present it beautifully”***

*Ravi Paranjape*

# Visual
MELODY

Visual Melody is a content-rich Free quarterly E- Magazine offered by The Ravi Paranjape Studio, dedicated to great Indian artists of the past and present generations.

*This FREE e-magazine is published quarterly in Marathi and English.*

*Visual Melody* ***FREE*** *subscription link:*
[https://www.raviparanjape.org/emagazine](https://www.raviparanjape.org/emagazine)

***The Ravi Paranjape Studio***
*'The Ravi Paranjape Studio' is a privately operated group. The group’s objective is to promote the ‘Design Based Culture’ envisioned by Artist Ravi Paranjape, through several initiatives run at the studio’s art gallery and exhibition space located in Model Colony, Pune.*

***Credits***
*Editor: Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design : Vinayak Chhatre*
*Project Coordinator: Varsha Pendse*

*1 Rutika, 1098/5-A, Model Colony,*
*Shivaji Nagar, Pune - 411016*

*+91 942 356 2530*
[www.raviparanjape.org](www.raviparanjape.org)
[abhijatkala@gmail.com](mailto:abhijatkala@gmail.com)

*All published information and images in this e-magazine are duly acknowledged and copyright protected by the respective parties.*
*This e-magazine is free to share as is. No part of this e-magazine shall be reproduced or shared in parts or used in any other way than intended.*

5th Year of
Visual Melody
E-Magazine

**THE 5TH YEAR OF VISUAL MELODY!**

Celebrating the 5th year of 'Visual Melody,' the FREE quarterly e-magazine offered by 'The Ravi Paranjape Studio'. 'Visual Melody' introduces you to brilliant Indian artists from various facets of visual art from the past and present generations. We are pleased to present the first issue of the fifth year of Visual Melody, featuring artist-cartoonist-caricaturist 'Mario Miranda'. This issue is published today on March 1, 2024 at raviparanjape.org/emagazine.

The inaugural issue of 'Visual Melody,' dedicated to the legendary painter Madhavrao Satavlekar, was launched on October 8th, 2019 under the auspices of Shri. Ravi Paranjape, commemorating his 84th birthday. Since 2020, the e-magazine featured one phenomenal artist each quarter– Shri K.B. Kulkarni, Shri N.S. Bendre, Shri Dinanath Dalal, Shri Gopalrao Deuskar, Shri Ravindra Mestry, Shri S.M. Pandit, Shri Ravi Paranjape, Shri S.D. Phadnis, Shri G.S. Majgaonkar, Shri Shivaji Tupe, Shri Datta Padekar, Shri Maruti Patil, Shri Madan Garge, Shri Charuhas Pandit, Shri Chintamani Hasabnis, and Shri Arvind Mestry. All of these issues are available at raviparanjape.org/emagazine for your enjoyment.

The creative team behind Visual Melody looks forward to continue bringing artistic brilliance to you through this publication. The exquisitely designed Visual Melody is published in English and Marathi in the same issue.

**'व्हिजुअल मेलडी' ई-अंकाचं पाचव्या वर्षात यशस्वी पदार्पण.**

द रवी परांजपे स्टुडियो तर्फे प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या 'व्हिजुअल मेलडी' या विनामूल्य ई-अंकाचं हे पाचवं वर्ष सुरु होत आहे. दृष्य कलेच्या विविध शाखांमधल्या, कालच्या आणि आजच्या पिढीतल्या अग्रणी कलाकारांची ओळख 'व्हिजुअल मेलडी' या अंकातून करून दिली जाते. 'व्हिजुअल मेलडी' च्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ आज १ मार्च २०२४ ला प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकातून सुप्रसिद्ध चित्रकार-व्यंगचित्रकार श्री. मारियो मिरांडा यांच्या कलेला दिलेल्या आदरांजलीने करत आहोत.

ज्येष्ठ चित्रकार श्री. माधवराव सातवळेकर यांना मानवंदना देणारा 'व्हिजुअल मेलडी' चा पहिला अंक ८ ऑक्टोबर २०१९ साली श्री. रवी परांजपे सरांच्या ८४ व्या वाढदिवसाचं औचित्य साधत प्रसिद्ध झाला. त्यानंतर २०२० सालापासून प्रत्येक तिमाहीला एकेका दिग्गज कलाकाराची ओळख करून देणारे 'व्हिजुअल मेलडी' चे अंक प्रसिद्ध केले गेले, त्यात या अत्यंत गुणी कलाकारांचा समावेश आहे – श्री. के. बी. कुलकर्णी, श्री. एन. एस. बेंद्रे, श्री. दिनानाथ दलाल, श्री. गोपाळराव देऊस्कर, श्री. रवींद्र मेस्त्री, श्री. एस. एम. पंडित, श्री. रवी परांजपे, श्री. शि. द. फडणीस, श्री. जी. एस. माजगावकर, श्री. शिवाजी तुपे, श्री. दत्ता पाडेकर, श्री. मारुती पाटील, श्री. मदन गर्गे, श्री. चारुहास पंडित, श्री. चिंतामणी हसबनीस, आणि श्री. अरविंद मेस्त्री. हे सर्व अंक raviparanjape.org/emagazine या ठिकाणी सर्व कालारसिकांसाठी उपलब्ध आहेत.

'व्हिजुअल मेलडी' चं संपादक मंडळ अशाच गुणी कलाकारांची ओळख तुमच्या पर्यंत पोचवायला कायम प्रयत्नशील राहील. 'व्हिजुअल मेलडी' चा अत्यंत सुबक आणि देखणा ई-अंक दर तीन महिन्याला इंग्लिश आणि मराठी अशा दोन भाषांत प्रसिद्ध होतो.





चित्रकार

# वॉल्टर लँगहॅमर

व्हिजुअल मेलडी च्या ह्या अंकातून आपण Walter Langhammer ह्या जन्माने ऑस्ट्रीयन पण ज्यांची कला कारकीर्द भारतात फुलली अशा एका अनोख्या कलावंताची ओळख करून घेणार आहोत. नाझी भस्मासुराच्या कचाट्यात सापडलेल्या ऑस्ट्रीया मधून बाहेर पडत मुंबईत यायला त्यांच्या एका भारतीय वंशाच्या विद्यार्थिनीने उद्युक्त केलं. ते भारतीय कलाविश्वात सरावलेच परंतु विशेषतः उपयोजित कलाविश्वात स्वतःचा ठसा उमटवत त्यांनी आर्ट डिरेक्टर ह्या नात्याने 'टाइम्स ऑफ इंडिया' चा कालविभाग एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला.


~ चित्रकार राहुल देशपांडे

**चित्रकार वॉल्टर लँगहॅमर**


1938 साली युरोपमधील ऑस्ट्रीया देशातील एक तरूण चित्रकार आपल्या पत्नीसह भारतात पोहोचला. त्यावेळेस त्याच्या सोबत दोन गोष्टी होत्या. एक म्हणजे गुणवत्तापूर्ण रेखांकनासह आत्मविश्वासाने पेन्टींग करण्याची क्षमता आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्वत:च्या कलाकारकीर्दी विषयी पूर्ण अनिश्चितता.

युरोपवर दुसऱ्या महायुद्धाचे काळे ढग जमले होते. हिटलरचे नाझी सैन्य ऑस्ट्रीयात घुसले होते. कोणत्याही क्षणी सैन्याच्या तावडीत सापडण्याची शक्यता दाट होती. अशावेळेस जन्माने ज्यू असल्याने तो तरूण चित्रकार व त्याची पत्नी ह्यांच्यावर आपला जीव वाचवण्यासाठी मातृभूमी सोडून जाण्याची वेळ आली होती. नियतीने लादलेल्या ह्या निर्णयातच पुढील उज्ज्वल कलाकारकीर्दीची बीजे दडलेली होती. त्याच बरोबर संपूर्ण भारतीय चित्रकला क्षेत्रालाही एक वेगळी दिशा मिळण्याचे संकेतही ह्या घटनेत लपले होते.





> अभिव्यक्तीतील ठसठशीतपणा,
> आकारांचे सुलभीकरण,
> ब्रशचे जोरकस फटकारे,
> उजळ परंतु सुसंवादी रंगसंगती,
> प्रत्यक्ष चित्रणावर भर ही त्यांची
> प्रमुख वैशिष्ट्ये होती.










वॉल्टर लँगहॅमर असे ह्या चित्रकाराचे नाव. त्यांच्या परिचयात असलेल्या सीलू वकील ह्या भारतीय पारशी विद्यार्थिनीने त्यांना भारतात येण्याचे आमंत्रण दिले. परंतु भारतात पोहोचताच ब्रिटिश अधिकाऱ्याने संशयावरून त्यांना अटक केली. पत्नी केथला सातारा तर वॉल्टर यांना अहमदनगर येथे धाडले. दरम्यान विद्यार्थिनी सीलू (लग्नानंतरच्या शिरीन विमा दलाल) हिने त्यांची पेन्टिंग्ज बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनासाठी पाठवली होती. अचूक रेखांकन आणि जोरकस रंगलेपन असलेली ही चित्रे प्रदर्शनात खूप गाजली. तत्कालीन ब्रिटिश पद्धतीपेक्षा हे काम खूप निराळे होते. युरोपमधील कलक्षेत्रात घडून आलेले बदल त्यात स्पष्टपणे प्रतिबिंबीत झाले होते. ह्यातील एक व्यक्तिचित्र सीलू वकीलचे होते; तर दुसरे एका नटाचे व्यक्तिचित्र होते. ह्या प्रदर्शनाचा परिणाम म्हणून त्यांची सुटका झाली व ते मुंबईत कामाच्या शोधार्थ दाखल झाले. जणू त्यांच्या मागचे दुष्टचक्र संपले.

वॉल्टर लँगहॅमर ह्यांचा जन्म 1905 मध्ये ऑस्ट्रीयातील ग्रेझ शहरात ज्यू कुटुंबात झाला. व्हिएन्ना येथील अकेडमी ऑफ फाईन आर्ट्समध्ये 1922 ते 1927 दरम्यान त्यांनी चित्रकलेचे उच्च शिक्षण घेतले. प्रसिद्ध चित्रकार ऑस्कर कोकोश्का हा त्यांचा समकालीन होता. त्याच्या रंगलेपन पद्धतीचा लँगहॅमर यांच्यावर प्रभाव होता. कलाशिक्षण संपवल्यानंतर त्यांनी सुमारे 11 वर्षे स्टेट कॉलेज ऑफ आर्ट, व्हिएन्ना येथे पेन्टिंग विषयाचे अध्यापन केले. 1935 साली ते विवाहबद्ध झाले. ह्या कॉलेजमध्ये विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्याची ओळख होती.

भारतातून गेलेली सीलू वकील ही त्यांची ह्याच काळातील विद्यार्थिनी. भारतातील वातावरण, विषय, रंग चित्रकार म्हणून तुम्हाला खूप भावतील, असे सांगत ती त्यांना भारतात येण्याचा आग्रह करत असे. अखेर ऑस्ट्रीयातील अस्थिर परिस्थितीमुळे 1938 साली प्राध्यापकाची नोकरी सोडून ते भारतात दाखल झाले.






1940 साली त्यांना टाइम्स ऑफ इंडियाचे आर्ट डायरेक्टर म्हणून पद मिळाले आणि एका मोठ्या सृजनपर्वाची सुरुवात झाली. टाइम्स ऑफ इंडिया ऍन्युएल, इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडियामधून त्यांची बोधचित्रे, कव्हर्स छापली जाऊ लागली. दर्जा-गुणवत्ता-नाविन्य यामुळे त्यांच्या कामाला देशपातळीवर मान्यता मिळाली व त्यामुळे कामाची मागणीही वाढली. उपयोजित कलेतील भारतातील मानदंड म्हणून त्यांच्याकडे बघितले जाऊ लागले. कव्हर्स, कथाचित्रं, आर्टप्लेट्स, जाहिराती, ब्रोशर्स, कॅलेंडर अशा अनेक प्रकारात त्यांनी खूप काम केले. कलात्मक दर्जा आणि विचार प्रसारणाच्या गरजेनुसार चित्रांची निर्मिती करताना त्यांची छपाई तंत्राची अचूक जाण महत्त्वाची ठरत होती. अभिव्यक्तीतील ठसठशीतपणा, आकारांचे सुलभीकरण, ब्रशचे जोरकस फटकारे, उजळ परंतु सुसंवादी रंगसंगती, प्रत्यक्ष चित्रणावर भर ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये होत. जलरंग, पेन अँड इंक, स्क्रेपर बोर्ड, पेस्टल, पोस्टर कलर्स, वॉटरप्रुफ इंक, तैलरंग अशा अनेक माध्यमांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे त्यांच्या निर्मितीत खूप वैविध्य होते. साहजिकच हे सर्व काम भारतातील अनेक चित्रकारांना प्रेरणादायी ठरले.







Firestone



उपयोजित कलेबरोबरच त्यांनी पेन्टिंगच्या क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. भारतातील प्रांतिक विविधता, तेथील लोकजीवन, चालीरिती, धार्मिक सोहळे, उत्सव, रंगांची विविधता, निसर्गाचे वेगळेपण, वास्तुरचना या सगळ्यांतून त्यांना चित्रासाठी अनेक विषय मिळाले. भारतातील अनेक ठिकाणी भेटी देऊन त्यांनी प्रत्यक्ष चित्रण केले. ज्यामध्ये निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, लोकजीवन, मिरवणूका, उत्सव यांचेही चित्रण त्यांनी आपल्या शैलीमध्ये केले. भारतातील वातावरण, सूर्यप्रकाश, रंगांची विविधता, चित्रांमध्ये व्यक्त करताना त्यांनी इम्प्रेशनिझम, पोस्ट-इम्प्रेशनिझम, फॉविझम या कलावादांच्या विचारसरणीचा वापर केलेला आढळतो. रंगांची शुद्धता, रंगांचे दृश्यतापमान यांतून वातावरणाचा आभास निर्माण केला आहे. जोरकस, ऊर्जायुक्त असे ब्रशचे फटकारे, नाइफच्या साहाय्याने केलेले जाड रंगलेपन याने आविष्कारात ठसठशीतपण दिसून येतो. त्यांची नाशिक, मुंबई, काश्मीर, केरळ, राजस्थान अशा ठिकाणची चित्रे विशेष प्रसिद्ध आहेत. ते दरवर्षी युरोपला जाऊन येत व तेथे केलेली चित्रे आणि भारतातील चित्रे यांचे मुंबईला प्रदर्शन करत असत.

अनेक तरूण चित्रकारांना या चित्रतंत्राची भुरळ पडली. रझा, आरा, सुझा, हुसेन, रायबा, बेन्द्रे, गोडसे यांपासून बाबूराव सडवेलकर ते रवी परांजपे अशा पुढील पिढीच्या चित्रकारांनी लँगहॅमर यांच्या कामातून प्रेरणा घेतलेली दिसते.





मुंबईत राहात असल्याने अनेक धनाढ्य पारसी व इतर उद्योगपती ह्यांच्या कुटुंबातील सदस्यांची व्यक्तिचित्रे लँगहॅमर यांनी मोठ्या प्रमाणात केली. ह्यात चित्ररचना, रंगसंगती, रंगलेपनपद्धती ह्यामध्ये त्यांनी अनेक प्रयोग केलेले दिसतात, जे आजही अभ्यासनीय आहेत.

मुंबईतील कलाक्षेत्रावर त्यांचा मोठा प्रभाव होता. रूडी लायडन, एमॅन्युअल श्लेसिंजर या मित्रांबरोबर बॉम्बे आर्ट सोसायटीमध्ये ते क्रियाशील होते. १९५०-६०च्या दशकात त्यांच्या अस्तित्वाने भारतीय कलाक्षेत्रात मोठा बदल घडून आला. आपल्या स्टुडिओत दर रविवारी ते तरूण चित्रकारांशी संवाद साधत. यातून युरोपातील आधुनिक कलेबाबतच्या अनेक गोष्टी तरूण चित्रकारांपर्यंत पोहोचत होत्या. त्यांनी अनेक भारतीय चित्रकारांना प्रोत्साहन दिले. चित्रकार द. ग. गोडसे यांना सहा वर्षे लँगहॅमर यांचा सहवास व प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाला. अनेक ठिकाणी दिलेली त्यांची प्रात्यक्षिके ही खूप गाजली. त्यांना प्रत्यक्ष काम करताना पाहण्याची ती दुर्मिळ संधी ठरली.

सुमारे दोन दशकांच्या प्रभावशाली कारकिर्दीनंतर १९५८मध्ये ते भारत सोडून पुन्हा युरोपात गेले. तेथे त्यांनी बोधचित्रे व पेन्टिंगचे आपले काम चालू ठेवले. १९७७ साली लँगहॅमर यांचे निधन झाले. परंतु त्यांच्या चित्रसंचितातून आजही तरूण चित्रकारांना प्रेरणा मिळत राहील. उपयोजित कला व पेंटिंगच्या क्षेत्रात त्यांनी अभिजात कलागुणांचीच पूजा केली. गुणवत्तापूर्णा काम हे ध्येय ठेवून दोन्ही क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला. एका परदेशी चित्रकाराच्या नजरेतून पाहिलेला भारत व त्याच्या सुंदर दृश्यनोंदी त्यांच्या पेंटिंगच्या स्वरूपात आज आपण अनुभवू शकतो.

~ चित्रकार राहुल देशपांडे

संदर्भ :


- कॅलि डोस्कोप - प्रा. मं. गो. राजाध्यक्ष
- Encyclopaedia ,Visual Art of Maharashtra
- Editor : Suhas Bahulkar / Deepak Ghare
- शिखरे रंग रेषांची – रवी परांजपे


टीप -

चित्रसौजन्य : बॉम्बे आर्ट सोसायटी कॅटलॉग, रवी देव, गोपाळ नांदूरकर, राहुल देशपांडे आणि इंटरनेटवरून.

Artist

# WALTER LANGHAMMER

In this issue of Visual Melody, we introduce you to Walter Langhammer, an Austrian artist by birth whose career flourished in India. Langhammer arrived in Mumbai to escape the unrest in Austria due to the Nazi invasion, encouraged by one of his art students of Indian descent. He was soon assimilated into the Indian art world, particularly the commercial art world in Mumbai, and led the art department of the 'Times of India' to new heights as its art director.

English interpretation: Varsha Pendse



## Artist Walter Langhammer


An accomplished Austrian artist and art professor arrived in India in 1938 with his wife, with two things: his exceptional painting skills and uncertainty about his artistic future.

The dark clouds of World War II were looming over Europe. Hitler's Nazi army had invaded Austria, and there was a constant threat of being captured. This artist fled his homeland with his wife to save their lives. This unexpected turn of events laid the foundation for his brilliant artistic career ahead. It also marked the beginning of an exciting shift in the Indian art scene.





*Langhammer's paintings reflect the diversity of Indian culture, Landscape and people in pure bold colors and varying color temperatures*





This brilliant artist was Walter Langhammer. He came to India at the invitation and insistence of one of his students and a friend, Shirin Amadalal (née Siloo Vakil). However, upon arriving in India, Walter and his wife Kathe were arrested by the British authorities on suspicion. Kathe was held in Satara, while Walter was detained in Ahmednagar. Meanwhile, during these tumultuous times, Siloo had entered two of his paintings in the Bombay Art Society's exhibition. His paintings, with their precise line drawing and bold use of colors, created a stir in the art world. His work demonstrated a departure from the traditional British-style art prevalent in India at the time.

One of the paintings was a portrait of Shirin, while the other was of a leading actor. As a result of the exhibition, Walter was released from custody and came to Mumbai to seek career opportunities. The spell of bad luck had finally ended.





Walter Langhammer was born into a Jewish family in 1905 in Graz, Austria. He received his art education at the Academy of Fine Arts in Vienna from 1922 to 1927. His work was influenced by the painting style of a renowned artist of that time, Oskar Kokoschka. After completing his art education, Langhammer taught painting at the State College of Art in Vienna for about 11 years. In 1935, he married Kathe. He was a popular instructor among his students. Siloo was his student during this time. She often asked Professor Langhammer to visit India to experience its vibrant culture and colors. Due to the rising unrest in Austria, he finally left his position as a college professor and fled to India to try his luck.

Langhammer's true artistic journey in India began as an art director for the Times of India in 1940. His paintings and illustrations were published in the Times of India Annual, Illustrated Weekly of India, and other leading publications. His work was recognized nationwide for its quality and innovative approach. Walter Langhammer was soon considered a stalwart of applied art in India's commercial art world. He produced artwork for advertisements, story illustrations, book covers, art plates, and more. Langhammer's extensive knowledge of printing techniques helped him illustrate and fittingly bring out the message of the campaign.

Langhammer significantly contributed to the fields of commercial art as well as painting. His artistic style is characterized by clarity of expression, simplified forms, bold brushstrokes, and bright yet complementary color schemes. His work represents Impressionism, Post-Impressionism, and Fauvism. Langhammer experimented with various mediums, including watercolors, pen and ink, scraperboard, pastels, poster colors, and oil paints. His paintings reflect the diversity of Indian culture, landscapes, and people, in pure bold colors and varying color temperatures. Many of his paintings have come to life with energetic brush strokes and the use of a knife for paint application.


He traveled extensively across India, capturing the beauty of nature, people, and festivals in his work. His paintings of Nashik, Mumbai, Kashmir, Kerala and Rajasthan are immensely popular. Each year he held an exhibition in Mumbai to exhibit the paintings done in India and during his annual Europe trip.



V. LANGHAMMER • Shirin Vimadalal • 1938 • Gold Medal • Courtesy — Sohrab Vimadalal.







Langhammer's work had a significant impact on many Indian artists. He inspired many young artists, including Raza, Ara, Souza, Husain, and Bendre. His influence can be seen in the work of later artists like Baburao Sadwelkar and Ravi Paranjape. He also painted portraits of many prominent Parsi and Indian industrialists and their family members, experimenting with colors and compositional approaches.

Langhammer's presence had a profound impact on the Mumbai art scene. He was an active member of the Bombay Art Society with Rudolf von Leyden and Emmanuel Schlesinger. His studio was a hub for young artists, where he would engage in discussions and share his knowledge of European art. He encouraged many Indian artists and played a significant role in shaping the Indian modern art scene.

After two decades of a remarkable career in India, Langhammer returned to Europe in 1958. He continued to paint and do illustrations. He passed in 1977 leaving behind a legacy that continues to inspire young artists. His work in applied art and paintings of India from the viewpoint of a non-Indian painter remains unparalleled.

English interpretation: Varsha Pendse

References :


- Calidoscope - Prof. Mangesh Rajadhyaksha
- Encyclopaedia ,Visual Art of Maharashtra
- Editor : Suhas Bahulkar / Dipak Ghare
- Shikhare Rang Reshanchi - Ravi paranjape


Note :

Image Courtesy : Bombay Art Society Catalogue, Ravi Dev, Gopal Nandurkar, Rahul Deshpande and Internet



# The Sunday Sketch Club

An initiative by **The Ravi Paranjape Studio**

## On Every Sunday 9 am - 11 am

## Open for all

THE RAVI PARANJAPE STUDIO

**The Ravi Paranjpe Studio**


4, Rutika apts., 1098/5A, Model colony, Pune - 41016

Contact: +91 87 66 907 242 / +91 90 96 431 161

# Explore **Ravi Paranjape's** books in **Kindle eBook** format!! **Download today.**

- Read on your smartphone, tablet or computer
- Great for reference

All books available at
https://www.amazon.in



THE RAVI PARANJAPE STUDIO

# art & gallery exhibition space

600 sq ft indoor art gallery

1000 sq ft of beautifully designed outdoor exhibition space

Ideal for individual or group art shows, workshops, art demos..

Indoor and outdoor spaces are available separately or together

**find your expression!**

Inquire:

11 am to 7 pm
+91 9423562530

abhijatkala@gmail.com
raviparanjape.org

The Ravi Paranjape Studio
1 Rutika Apartments
1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

## Plan a visit to see the gallery and exhibition space

Call/WhatsApp +91 9423562530
abhijatkala@gmail.com

# *Glimpses of past and future activities of 'The Ravi Paranjape Studio.'*

*It's a pleasure to present the second issue of the year 2024, the fifth year of Visual Melody. In this issue of Visual Melody, we are featuring an intriguing story of Austrian painter Walter Langhammer who came to India under stressful conditions but thrived on the Indian soil.*

***Quarter At-A-Glance at The Ravi Paranjape Studio:***

- *The highlight of the second quarter is the celebration of 'World Art Day' at the studio! We held a two-day exhibition of the works of the Sunday Sketch Club members, workshop participants, and the students of ChitraDiksha. The gallery teemed with art lovers of all ages and skills of this exhibition can be seen on the studio's FB page.*
- *Two interesting workshops, charcoal techniques and soft pastels (repeated by popular demand) were also held in April 2024 by artist Vinayak Chhatre and artist Chaitanya Kubal.*
- *Paranjape Sir's books are now available in eBook format on Amazon, making them accessible to readers worldwide!*
- *LIMITED stock of Paranjape Sir's printed books can be ordered directly from the website www.raviparanjape.org*
- *The 'Sunday Sketch Club' is expanding beyond the physical boundaries of the studio, with several people joining the club's WhatsApp group and sharing their work. All individuals interested in sketching and drawing are welcome to join the 'Sunday Sketch Club,' regardless of their skill level.*
- *A new activity called 'Library Time' is added exclusively for the Sunday Sketch Club members! The Club patrons get exclusive access to a curated collection of books every first Sunday of the month. Join the Sunday Sketch Club, details at www.raviparanjape.org*

*We have exciting events coming up throughout the year.*

*Follow www.facebook.com/theraviparanjapestudio and instagram @theraviparanjapestudio for the latest announcements.*

*Visit here for the books authored by Ravi Paranjape-*
*https://raviparanjape.org/product-category/printed-books/*
*https://raviparanjape.org/ebooks/*

*Representative,*
*Ravi Paranjape Foundation*
*www.raviparanjape.org*



Compliments from
**RAVI PARANJAPE FOUNDATION, Pune**

For latest events please visit :
www.facebook.com/theraviparanjapestudio
Email: abhijatkala@gmail.com